## डॉ शांतीलाल धनजी देवसी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडा.

### मराठी विभाग

### दिनांक २३-११-२०२१ रोजी घेतलेल्या विभागातील बैठकीचे इतिवृत्त

दिनांक २३-११-२०२१ रोजी मराठी विभागाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस पुढील सभासद उपस्थित होते.

१ डॉ कैलास प्रभाक्रर जोशी ( विभागप्रमुख, सहयोगी प्राध्यापक)

२. डॉ. किरणकुमार सुबराव कवठेकर ( सहयोगी प्राध्यापक.)

सभेपुढील विषय.

१. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील सत्र १,३,५ मधील अध्यापनकार्याचा आढावा घेणे.

३. शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील सत्र १,३,५ मधील मराठी विभागाने घेतलेल्या उपक्रमांचा आढावा घेणे.

४. शैक्षणिक २०२१-२२ मधील सत्र ६ च्या निकालाची नोंद करणे.

५. आयत्यावेळी आलेल्या विषयावर चर्चा करणे.

विषय १. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मागील बैठकीचे इतिवृत्त वाचले जाऊन ते कायम करण्यात आले.

विषय २. शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील सत्र १,३,५ मधील अध्यापनकार्याचा आढावा घेणे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी असलेल्या मराठी साहित्य या विषयांतर्गत असलेल्या अभ्यासपत्रिकांचे अध्यापन किती पातळीवर झाले त्याचा आढावा घेण्यात आला. विभागातील शिक्षकांना नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाचे अध्यापन पूर्ण झाले आहे असे चर्चेत पुढे आले. सदर अध्यापन पूर्ण झाल्याचा अहवाल शिक्षकांनी बैठकीत सादर केला. सदर अहवालात अभ्यासक्रमाचे हेतू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले असल्याचे, तसेच अध्यापनादरम्यान सामाजिक दृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर, जसे लिंगभाव, जातीव्यवस्था, सामाजिक समता आदी चर्चा करण्यात आली असल्याचे ज्ञापन अंतर्भूत असल्याचे नमूद करण्यात आले. सदर अहवाल वाचून ते कायम करण्यात आले.

विषय ३. शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील सत्र १,३,५ मधील मराठी विभागाने घेतलेल्या उपक्रमांचा आढावा घेणे.

शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील सत्र १,३,५ मधील मराठी विभागाने घेतलेल्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. सदर बाबतच अहवाल सादर करण्यात आला. त्याचा वार्षिक अहवाल योग्य त्या विभागाकडे सादर करण्याचे ठरले.

विषय ४. शैक्षणिक सत्र २०१९-२०. मधील सत्र ६ च्या निकालाची नोंद करणे..

शैक्षणिक सत्र २०१९-२०.मधील सत्र ६ च्या निकालाची प्रत प्राप्त झाली होती. सदर निकालाचे विश्लेषण करून अहवाल तयार करण्यात आला होता. सदर अहवाल बैठकीत वाचून कायम करण्यात आला.

विषय ५. आयत्यावेळी आलेल्या विषयावर चर्चा करणे.

आयत्यावेळी कोणतेही विषय उपस्थित झाले नाही.

सदर चर्चेनंतर बैठक संपली.

स्थळ व दिनांक २४-११-२०२१

विभाग प्रमुख
मराठी विभाग
शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे,क
विज्ञान महाविद्यालय,वाडा,जि.ठा